# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

रासनिप्रा

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.**

**फोन नं.** - (०२०) २६०५०६४१ **ई मेल आयडी** - sceapune@gmail.com


**<u>निवडणूक महत्वाचे</u>**

जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक सुरु करणे/आदेश/ ०८५ /२०२५

दिनांक : ०३ /०९/२०२५

**वाचावे:-** १. अवर सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक - संकीर्ण १९२४/ प्र.क्र.१४१/ १३ स, दिनांक ०७.१०.२०२४

२. अवर सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शुध्दीपत्रक आदेश – संकीर्ण १९२४/ प्र.क्र.१४१/ १३ स, दिनांक ०७.१०.२०२४

३. अपर निबंधक नि सह सचिव, महाराष्ट्र शासन, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-१९२४/ प्र.क्र. १४१/१३-स, दिनांक ११.१०.२०२४

**प्रस्तावना:-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) अधिक्षण, संचालन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविलेली असून उक्त कलमाच्या उपकलम (१) नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या सार्वत्रिक निवडणूका, नैमित्तिक पद व समिती सदस्यांच्या पदाधिकारी यांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ हा नियम दिनांक १२.०९.२०१४ पासून अंमलात आलेला असून सदर नियमात वेळोवेळी सुधारणा झालेल्या आहेत. त्याप्रमाणे सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, शासनाकडील वाचावे क्र. १ व २ चे आदेशानुसार सन २०२४ मध्ये होणा-या विधानसभेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील शासनास असलेल्या अधिकारानुसार, राज्यातील २५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था, तसेच ज्या प्रकरणी मा. सर्वोच्च/ मा. उच्च न्यायालयाने सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याचे आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था, त्याचप्रमाणे ज्या सहकारी संस्थांच्या बाबतीत पात्र उमेदवारांना निशाणी / चिन्ह वाटप करुन अंतिम विधीग्राह्य नामनिर्देशनांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे अशा सहकारी संस्था वगळून, राज्यातील अन्य सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका शासन आदेशाच्या दिनांकापासून ज्या टप्प्यावर असतील, त्या टप्प्यावर स्थगित करुन दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत पुढे ढकललेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, तदनंतर शासनाने वाचावे क्र. ३ अन्वये, ज्या सहकारी संस्थांचे अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर पदाधिकारी निवड करण्यास आणि "ड" वर्गातील सहकारी संस्थांचीं निवडणूक प्रक्रिया चालू ठेवण्यास हरकत नसल्याबाबत तसेच सहकारी संस्थांच्या संचालक मंडळातील नैमित्तीकपणे रिक्त झालेले पद दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत भरणे योग्य होणार नाही असे कळविलेले आहे. सदर आदेशांचे पालन करणेबाबत सर्व जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्राधिकरणाने दिनांक १४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, उक्त वाचावे क्र. १ मधील शासन आदेशानुसार दि. ३१.१२.२०२४ रोजी सदर कालावधी संपुष्टात आला असून शासनाकडून सदर निवडणूका आणखी पुढे ढकलण्याबाबतचे आदेश निर्गमित केलेले नाहीत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

त्या अर्थी, शासनाने पुढे ढकललेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे संदर्भात प्राधिकरण पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: <u>आदेश</u> :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) तरतुदीन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण, शासनाने पुढे ढकललेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. वाचावे क्र. १ च्या शासन आदेशान्वये, मा. उच्च/ सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूकीस स्थगिती दिलेली अशा सहकारी संस्था वगळून अन्य सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत, त्या टप्प्यापासून संस्थेची निवडणूक प्रक्रिया **दिनांक ०६/०१/२०२५ पासून** सुरू कराव्यात.

**“अ” व “ब” वर्गातील** ज्या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम अंतिम मतदार यादी प्रसिध्दीनंतर पुढे ढकलण्यात आलेला आहे, अशा सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ मधील तरतुदीप्रमाणे तयार करून प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादर करावा.

तसेच **“अ” व “ब” वर्गातील** ज्या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम नामनिर्देशनाच्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आलेला आहे अशा सहकारी संस्थांचा **सुधारीत** निवडणूक कार्यक्रम प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादर करावा. प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त झालेनंतर निवडणूक कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

२. **“क” वर्गातील** ज्या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम अंतिम मतदार यादी प्रसिध्दीनंतर पुढे ढकलण्यात आलेला आहे, अशा सहकारी संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमास तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावर मान्यता देण्यात यावी.

तसेच **क” वर्गातील** ज्या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम नामनिर्देशनाच्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आलेला आहे अशा सहकारी संस्थांचा **सुधारीत** निवडणूक कार्यक्रमास तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावर मान्यता देण्यात यावी.

३. ज्या सहकारी संस्थांचा मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आलेला आहे, त्या टप्प्यापासून पुढे सुधारीत मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात यावा.

४. या आदेशाच्या दिनांकापर्यंत **“अ” “ब” “क” व “ड” वर्गातील** प्रलंबित असलेल्या ज्या सहकारी संस्थांनी निवडणूकीकरीता प्रारुप मतदार यादया संबंधित जिल्हा/ तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडे अदयापपर्यंत **दाखल केलेल्या नाहीत**, अशा सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता प्रारूप मतदार यादया तयार करण्यासाठी **दिनांक ०१/०१/२०२५** हा सुधारीत अर्हता दिनांक देण्यात येत आहे.

५. संघीय संस्थांच्या निवडणूकांकरीता सभासद संस्थांनी प्रतिनिधी नियुक्तीचे ठराव जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर केलेले असल्यास पुन्हा ठराव मागविण्याची आवश्यकता नाही. तथापि महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे **नियम १० (४)** मध्ये नमुद केलेल्या परिस्थितीत बदल करण्याची मुभा असलेले बदल स्विकारण्यात यावेत.

६. सर्व सहकारी संस्थांच्या संचालक मंडळातील नैमित्तीकपणे रिक्त झालेली पदे भरणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ७४ व प्राधिकरणाकडील परिपत्रक दिनांक १९.०४.२०२२ नुसार उचित कार्यवाही करावी.

७. तसेच ई-१ सन २०२५ मधील या आदेशाच्या दिनांकापासून निवडणूकीस पात्र सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदींनुसार सुरू कराव्यात.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे-१ सत्यमेव जयते

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति:-**
जिल्हा/ तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत:-**
१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे
३. मा. आयुक्त (वस्त्रोदयोग), नागपूर.
४. मा. आयुक्त (दुग्ध), महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२